# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**

पत्र क्र.रासेयो/७७०/२०१६—१७
दिनांक :३० डिसेंबर, २०१६

प्रति,
प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगरांमधील सर्व महाविद्यालये.

संदर्भ : संकीर्ण—११११/(प्र.क्र.१३७/१६)/समन्वय, दिनांक २२ डिसेंबर, २०१६.

विषय : मा. प्रधानमंत्री यांच्या पुढाकाराने आयोजित ''राष्ट्रीय एकता : सरदार पटेल'' हे प्रदर्शन नेहरू विज्ञान केंद्र, वरळी, मुंबई येथे दिनांक ०२ जानेवारी ते ०४ फेब्रुवारी, २०१७ दरम्यान प्रदर्शित होण्याबाबत.

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, ''राष्ट्रीय एकता : सरदार पटेल'' हे प्रदर्शन मा. प्रधानमंत्री, यांनी राष्ट्रीय विज्ञान केन्द्र, नवी दिल्ली येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ रोजी उदधाटन करून, राष्ट्राला समर्पित केले आहे. हे प्रदर्शन सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांचा उपक्रम असून, मा. प्रधानमंत्री, यांच्या विचारातील कल्पना व मार्गदर्शनाखाली साकार झालेले आहे. सदर प्रदर्शनामध्ये सरदार पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकीकरणाच्या कार्यात दिलेले योगदान हा संदेश देशातील विविध भागामध्ये पोहोचविण्यासाठी फिरते प्रदर्शनही सांस्कृतिक मंत्रालयाने तयार केले आहे.

सदर प्रदर्शनाद्वारे देशातील विविध भागातील जनतेला सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेले अथक व निस्वार्थ भारताच्या राजकीय एकीकरणाचे कार्य ज्यामुळे त्यांना भारताचे लोहपुरूष म्हणून ओळखण्यात येते याबाबतचे ज्ञान होण्यासाठी, सदर प्रदर्शन हे नेहरू विज्ञान केंद्र (सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार), डॉ. इ. मोसेस रोड, वरळी, मुंबई — ४०० ०१८ येथे दिनांक ०२ — ०७ जानेवारी, २०१७ च्या दरम्यान मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते शुभारंभ होऊन, त्यानंतर ते एक महिन्यासाठी प्रदर्शित करण्यात येणार आहे.

**दिनांक ०२ जानेवारी, ते ०४ फेब्रुवारी, २०१७** दरम्यान सदर प्रदर्शनास उत्कृष्ठ प्रोत्साहन मिळण्यासाठी आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांना प्रदर्शनाचा लाभ घेण्यास व प्रोत्साहित करण्यासाठी सदर बाब सर्वांच्या निदर्शनास आणण्याबाबत कार्यवाही करावी.

यामुळे सरदार वल्लभभाई पटेल व त्यांनी केलेल्या निस्वार्थ कार्याची माहिती विद्यार्थ्यांना मिळून राष्ट्रीय एकता वाढीस लागेल व प्रदर्शनाचा हेतू साद्य होईल. अनुकुल सहकार्याची अपेक्षा.

आपला विश्वासु

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग

प्रत: १) श्री. रा.वि. जाधव, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२.
२) डॉ, अतुल साळुंके, राज्य संपर्क अधिकारी, रा.से.यो., उच्च व तंत्र शिक्षण विभाग